# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

जावक क्र.मजीप्रा–1098/सभा–83/आ. 4

दिनांक : 20/5/1999

विषय :– दिनांक 26/3/99 रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 83 व्या बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक 26/3/99 रोजी झालेल्या 83 व्या सभेच्या कार्यक्रम बाबींवर चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय घेण्यांत आले, या सर्व सभेचीकार्यक्रम बाब इतिवृत्त, खालील प्रमाणे तयार करण्यांत आले आहे, त्यास मंजुरी मिळावी, ही विनंती.

(एन. रामाराव)
सदस्य सचिव (प्रशासन)

मा.मंत्री पा.पु.व स्वच्छता तथा
प्राधिकरणाचे अध्यक्ष

# दि.२६ मार्च, १९९९ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८३ व्या बैठकीचे अितिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ८३ वी बैठक मा.मंत्री,ग्राम विकास,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष मा.श्री.अण्णासाहेब डांगे, यांचे अध्यक्षतेखाली दि.२६ मार्च,१९९९ रोजी संपन्न झाली. या बैठकीस खालील सदस्य व विशेष निमंत्रित उपस्थित होते.

१) मा.मंत्री,ग्राम विकास,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष
२) मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द उपाध्यक्ष
३) श्री.व्ही.रंगनाथन,अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई
४) श्री.भानुदास पडळकर,सदस्य
५) श्री.आदिनाथ नवलेपाटील,सदस्य
६) श्री.माधव कुलकर्णी, सदस्य
७) श्री.आशिष कुलकर्णी,सदस्य
८) श्री.देवेंद्र फडणवीस,सदस्य
९) श्री.राजेंद्रसिंग, प्रधान सचिव,वित्त विभाग
१०) श्री.रमेशकुमार, सचिव,ग्राम विकास विभाग
११) श्री.जतिंदरसिंग साहनी,सदस्य सचिव(प्रशासन),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
१२) श्री.राजेंद्र सगणे,सदस्य सचिव(तांत्रिक),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी ''विशेष निमंत्रित'' म्हणून उपस्थित होते.

१) श्री.शे.दौ.अरमाळ,मुख्य अभियंता व विशेष कार्य अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई
२) श्री.भा.आ.डोंगरे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई
३) श्री.अ.ना.अळवणी,मुख्य अभियंता,कोकण प्रदेश,ठाणे.
४) श्री.नि.कृ.माडा,मुख्य प्रशासकीय अधिकारी,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
५) श्री.एन.आर.पौनिकर,अधीक्षक अभियंता(यांत्रिकी),म.जी.प्रा.,ठाणे
६) श्री.मिलिंद केळकर,अधीक्षक अभियंता(समन्वय),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
७) श्री.बी.एस.पाटील,उप मुख्य लेखा अधिकारी(१),म.जी.प्रा.,नवी मुंबई

मा.मंत्री,ग्राम विकास,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी प्रस्तावित कार्यक्रम बाबींवर चर्चा करण्याचे निर्देशित केल्यानंतर सभेस सुरुवात झाली.

नव्याने नियुक्ती करण्यात आलेले मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपाध्यक्ष श्री.अर्जुनजी खोतकर हे प्राधिकरणाच्या बैठकीस प्रथमच उपस्थित असल्याने श्री.राजेंद्र सगणे,सदस्य सचिव(तांत्रिक),यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. तसेच मा.मंत्री,ग्राम विकास,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांचेही या प्रसंगी पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आल्यानंतर कार्यक्रम बाबींवर चर्चा करण्यास सुरुवात झाली.

## कार्यक्रम बाब क्र.१:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८२ व्या सभेचे अितिवृत्त

मा.अध्यक्षांनी प्राधिकरणाच्या ८२ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देण्याच्या अनुषंगाने उपस्थित सदस्यांकडे विचारणा केली. यावर सर्व सदस्यांनी एकमताने इतिवृत्तास मान्यता दिली.

ड) **प्राधिकरणाच्या विभागीय कार्यालयांना झेरॉक्स मशीन्स् पुरविणे.**

य सचिव प्रशासन व अर्थ) व अ.अ. (समन्वय)

याबाबतचा प्रस्ताव निर्णयासाठी प्राप्त झाला असल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले. तथापि, दर करारावर उपलब्ध असणारे व दर करारावर उपलब्ध नसणारे पण केंद्रीय भांडार दरसूचीवर उपलबध असणारे झेरॉक्स मशीन्स याबाबत परिपूर्ण आढावा घेवून निर्णय घेण्यात येईल असे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले. ''प्राधिकरणाच्या ८२ व्या बैठकीमध्ये दर करारावर उपलब्ध असणारेच मशीन्स खरेदी करण्याचे ठरविण्यात आले असताना विलंब का होत आहे'' अशी विचारणा श्री.माधव कुलकर्णी, सदस्य,यांनी केली. तसेच असा विलंब होत असेल तर आता हे मशिन्स घेणे आवश्यक आहे काय याचा आढावा घ्यावा असेही त्यांनी स्पष्ट केले. यावर मा.अध्यक्षांनी स्पष्ट केले की, या वर्षीच्या अर्थसंकल्पातील सवलतीमुळे झेरॉक्स मशीन्सच्या किंमती कमी होण्याची शक्यता असल्याने याबाबत आढावा घेण्यासाठी सर्व पुरवठादारांना आजच दुपारी बोलाविण्यात आले असून झेरॉक्स मशीन्स खरेदी करण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल. त्यांनतर या विषयावरील चर्चा पूर्ण करण्यात आली.

कार्यवाही

सदस्य सचिव (तांत्रिक)

इ) **महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची आर्थिक स्थिती**

या विषयावर चर्चा करताना सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी स्पष्ट केले की, सर्व मुख्य अभियंत्यांची बैठक घेवून कामांची गती वाढविण्याबाबत त्यांना सूचना दिल्या असून योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे. यावर अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांनी सूचना दिल्या की, अर्थसंकल्पिय तरतूदीनुसार कोणत्या मंडळाने किती निधी वापरावयाचा होता व प्रत्यक्षात किती निधी वापरला गेला तसेच कोणत्या मंडळाकडून कमी निधी वापरला गेला व त्याची कारणे काय आहेत या दृष्टीने आढावा घ्यावा व तशी माहिती सादर करावी. यावर अशा पध्दतीची माहिती मागविण्यात येवून ती शासनास सादर करण्यात येईल असे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी सांगितले.

कार्यवाही

मुख्य अभियंता, पुणे

या विषयावर चर्चा करताना श्री.माधव कुलकर्णी,सदस्य,यांनी सांगितले की, प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून निर्णय घेण्यास काही प्रकरणी विलंब होतो व परिणामी योजनेची कामे रखडतात व भाववाढीपोटी जास्तीचा खर्च करावा लागतो. या अनुषंगने त्यांनी म्हसवड पाणी पुरवठा योजनेचे उदाहरण दिले. या कामाचे कार्यादेश मे.शेठ मसुरकर आणि कंपनी यांना देण्यांत आले असून काम सुरु असले तरी मुख्य संतुलन टाकीची जागा पाटबंधारे विभागाकडून हस्तांतरीत करुन घेण्यास विलंब झाल्यामुळे कामास उशीर होणार आहे. याबाबत प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून पाठपुरावा व निर्णय घेण्यास विलंब केल्याने ही परिस्थिती उद्‌भवली असे त्यांनी स्पष्ट केले. यावर अपर मुख्य सचिव,यांनी आढावा घेण्यात येवून योग्य ती कार्यवाही सत्वर करावी तसेच जागा हस्तांतरणाबाबत पाटबंधारे विभागाशी संपर्क साधावा अशा सूचना दिल्या. एकंदरीतच कामाची गती वाढविण्याबाबत प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत व उद्दिष्टपूर्तीबाबत सतर्क रहावे असे मा.अध्यक्षांनी स्पष्ट केले.

कार्यवाही

अधीक्षक अभियंता (मुख्यालय)

फ) **प्राधिकरणाकडून राबविल्या जाणाऱ्या नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी सिमेंट पुरवठा**

प्राधिकरणाकडून राबविण्यात येणाऱ्या नागरी पाणी पुरवठा योजनांना लागणारे सिमेंट, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या धर्तीवर, कंत्राटदारांनीच आणावे याबाबत ही कार्यक्रम बाब सादर करण्यात आली होती. यानुसार प्राधिकरणास १९९९-२००० मध्ये किती नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी एकूण किती सिमेंट लागेल व सदर सिमेंट कंत्राटदाराने आणल्यास त्याचे काय परिणाम असतील याबाबत तुलनात्मक तक्ते तयार करण्याचे काम सुरु असल्याचे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी स्पष्ट केले. तथापि, प्राधिकरणास कुठल्या दराने सिमेंट उपलब्ध होईल व सध्या सिमेंटचा बाजारात दर काय आहे याची विचारणा मा.राज्यमंत्री,यांच्याकडून करण्यात आली असता प्राधिकरणास साधारणत: रु.९८ ते १०० प्रति गोणी या भावाने सिमेंट मिळेल व सिमेंटचा सध्याचा बाजारभाव रु.११८ ते १२५ प्रति गोणी इतका असल्याचे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी सांगितले. यावर मा.मंत्री महोदयांनी ग्राम विकास विभागाने सध्या सिमेंटचे दर मागविले होते त्याअनुषंगाने प्राप्त झालेले दर काय आहेत याची विचारणा सचिव, ग्राम विकास यांच्याकडे

केली असता, रु.१९०० ते रु.२२०० प्रति टन(९५ ते ११० रु.पोते)(त्या-त्या जिल्हयाच्या ठिकाणी पोहोच) असे दर प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रम बाबींच्या अनुषंगाने सविस्तर आढावा घेवून माहिती सादर करावी अशा सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या. त्या अनुषंगाने सविस्तर माहितीसह ही कार्यक्रम बाब प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करण्याचे ठरविण्यात आले. तसेच एखादया विशिष्ट कंपनीचे सिमेंट घ्यावे असे काही ठरविता येईल काय याचाही विचार व्हावा अशी सूचना मा.उपाध्यक्षांनी मांडली.

## ग) भरारी पथकाची निर्मिती व गुण नियंत्रण

भरारी पथकाची निर्मिती झाली असून त्याचे कार्यही सुरु झाल्याचे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी स्पष्ट केले. तसेच कोणत्या तक्रारींची दखल भरारी पथकाने घ्यावी याबाबतही निर्देश देण्यात आल्याचे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी स्पष्ट केले. यावर कोणी कोणाकडे तक्रार केल्यास भरारी पथक त्याची चौकशी करेल याबाबत अधीक स्पष्ट माहिती दयावी अशी विनंती सर्वश्री नवले पाटील व माधव कुलकर्णी,यांनी केली. त्यावर प्राधिकरणाचे सदस्य,विधानसभा/विधानपरिषद सदस्य यांनी तक्रार केल्यास त्याबाबत भरारी पथकाकडून चौकशी करण्यात येईल व अन्य प्रकरणी गुण नियंत्रण कक्षाकडून चौकशी करण्यात येईल असे सदस्य सचिव(प्रशासन)यांनी सांगितले. यावर बोलताना मा.अध्यक्षांनी स्पष्ट केले की, प्राधिकरणाच्या सदस्यांनी सदस्य सचिव(तांत्रिक) यांच्याकडे तक्रार सादर केल्यास सदर तक्रारीबाबत चौकशी करण्याचे आदेश सदस्य सचिव(तांत्रिक) भरारी पथकास देतील. एक महिन्यामध्ये या तक्रारीबाबत चौकशी अहवाल मध्यवर्ती समितीसमोर ठेवण्यात यावा अशी सूचना अपर मुख्य सचिव,यांनी केली. तसेच भरारी पथकाची गुणवत्ता नियंत्रणासाठी खूपच गरज असल्याची बाब मा.राज्यमंत्र्यांनीही मांडली व ती सर्वांना मान्य असल्याचे सदस्यांनी स्पष्ट केले.

कार्यवाही

विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता

गुणवत्ता नियंत्रणासाठी एखादया योजनेची पूर्णत: पाहणी व उपाययोजना याबाबत सुरुवातीपासूनच व्हीजेटीआय, आयआयटी, व्हीआरसीई या सारख्या त्रयस्थ यंत्रणेंकडून कार्यवाही करण्यात यावी. जेणेकरुन कामामध्ये होणाऱ्या चुका नंतर दुरुस्त करण्यापेक्षा प्रथमपासूनच चुका होवू नयेत याबाबत दक्षता घेता येईल ही बाब प्रभावीपणे श्री.फडणीस यांनी मांडली. या अनुषंगाने विचार करणे क्रमप्राप्त असल्याचे मा.अध्यक्षांनी सूचित करुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून याबाबत कोणती कार्यप्रणाली अंमलात आणण्यात येते याचा आढावा घेवून कार्यवाही करावी असे आदेशित केले.

एकंदरितच गुणवत्ता नियंत्रणाबाबत भरारी पथकाने अधिक जोमाने कार्य करावे अशा भावना सर्वच सदस्यांनी व्यक्त केल्या.

## ह) मे.सुरेंद्र इंजिनिअरिंग कंपनी लिमिटेड यांना देण्यात आलेली कामे.

प्राधिकरणाच्या ८२ व्या बैठकीमध्ये ठरविण्यात आल्यानुसार मे.सुरेंद्र इंजिनिअरिंग यांच्याकडून सुरु असणाऱ्या कामांचा तपशील दर्शविणारा तक्ता सादर केल्याचे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी निदर्शनास आणून दिले.

कार्यवाही

अधीक्षक अभियंता (समन्वय)

ब्रम्हपुरी,न्हावाशेवा व वसई-विरार येथील कामांची प्रगती समाधानकारक नसल्याचे अपर मुख्य सचिव,यांनी स्पष्ट करुन सदर ठिकाणी लावण्यात आलेला दंड फारच कमी असल्याचे सांगितले. तसेच दिग्रस पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी तर फक्त रु.१००/- प्रतिदिन इतका कमी दंड लावण्यात आल्याचे निदर्शनास आणून दिले. अशा कमी दंड आकारणीमुळे कंत्राटदारावर वचकही राहत नाही व कामाच्या प्रगतीबाबत म्हणावी अशी दखलही कंत्राटदार घेत नाही ही बाब फार गंभीर असल्याचे अपर मुख्य सचिव,यांनी सांगितले. यावर मा.अध्यक्षांनी अशा सूचना केल्या की, दंडात्मक कार्यवाही बाबत कार्यप्रणाली ठरविण्यात यावी व जसे आपण १८% दराने व्याज आकारणी करतो या दराने दंड आकारणी केल्यास काय होईल याची विचारणा केली.यावर सदस्य सचिव(प्रशासन)यांनी स्पष्ट केले की, निविदा किंमतीच्या १०% पर्यंत दंडात्मक कार्यवाही अंतर्गत रक्कम वसुल झाल्यानंतर व तोपर्यंत काम पूर्ण न झाल्यास काम काढून घेण्यात यावे या अनुषंगाने कार्यवाही होणे गरजेचे आहे. यावर मा.अध्यक्षांनी आढावा घेवून असे स्पष्ट केले की, पाणी पुरवठा योजनांसाठी आपण बॉंडव्दारे उभारलेल्या निधीवर १४.५०% व्याज दर आकारणी होणार

आहे अशाच धर्तीवर ज्या कामावर दंडात्मक कार्यवाही करावयाची आहे त्या कामाच्या एकूण किंमतीच्या १४.५०% दराने दररोज दंड आकारणी करावी व दंडाची रक्कम अशी ठरविण्यात यावी की, एकूण कामाच्या १०% रक्कम आठ महिन्यात वसुल होईल व तोपर्यंत काम पूर्ण न झाल्यास काम सदर कंत्राटदाराकडून काढून घेण्यात यावे. यावर सर्व सदस्यांनी सहमती दर्शवून कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

कार्यवाही
मुख्य अभियंता पुणे

या अनुषंगाने श्री.माधव कुलकर्णी,सदस्य,यांनी विचारणा केली की, सुरेंद्र इंजिनिअरिंग यांच्याकडून सुरु असणाऱ्या कामाचा जो तपशील सादर केला आहे त्यामध्ये पूर्ण झालेल्या कामाची टक्केवारी दिली आहे. मात्र प्रत्यक्षात झालेला खर्च देण्यात आलेला नाही. एकूण झालेल्या कामाची टक्केवारी व निविदा किंमतीशी झालेल्या खर्चाची टक्केवारी जुळेलच असे नाही. तसेच काही ठिकाणी निविदेच्या किंमतीपेक्षा जास्ती खर्च झाला असावा असाही मुद्दा त्यांनी मांडला. यावर झालेल्या खर्चाची रक्कम विचारात घेवूनच ही टक्केवारी काढण्यात आल्याचे विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता,यांनी स्पष्ट केले. तथापि, यामध्ये भाववाढ व इतर अनुषंगिक खर्चाचा समावेश नसावा असे श्री.माधव कुलकर्णी,सदस्य,यांनी स्पष्ट करुन इचलकरंजी पाणी पुरवठा योजनेचा खर्चासह पूर्ण तपशील त्यांना दयावा अशी मागणी केली. त्यावर या कामाबाबतची सविस्तर माहिती त्यांना देण्यात येईल असे विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता,यांनी सांगितले.

कार्यवाही
अधीक्षक अभि. (मुख्यालय)

या अनुषंगाने चर्चा करताना अपर मुख्य सचिव,यांनी सूचित केले की, ज्या कंत्राटदारांची कामे समाधानकारक नाहीत त्यांची नावे काळ्या यादीत टाकून ती प्राधिकरणाच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात यावीत.जेणेकरुन प्राधिकरणाच्या एखादया मंडळांतर्गत असमाधानकारक कामामुळे एखादया ठेकेदारास अर्हतापात्र ठरविले नसेल तर तो इतर मंडळांतर्गत कामांसाठीही अर्हतापत्र ठरु नये याबाबत प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी योग्य ती दक्षता घ्यावी. असमाधानकारक काम असले तरी सर्वच ठिकाणी कंत्राटदारावर कार्यवाही करण्यात येतेच असे नाही ही बाब अपर मुख्य सचिव,यांनी स्पष्ट करुन याबाबत नळदुर्ग पाणी पुरवठा योजनेचे त्यांनी उदाहरण दिले व असे प्रकार टाळून असमाधनकारक काम आढळल्यास त्वरित कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशाही सूचना त्यांनी केल्या.

या कार्यक्रम बाबीमध्ये अंतर्भूत असणाऱ्या इतर मुद्यांबाबत प्राधिकरणाकडून करण्यात आलेली कार्यवाही मान्य असल्याचे सांगण्यात येवून या कार्यक्रम बाबीवरील चर्चा पूर्ण झाली.

## कार्यक्रम बाब क्र.३:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन १९९७-९८ या वर्षाचे लेखे स्वीकृतीसाठी प्राधिकरण सदस्यांमध्ये फिरवून मंजूर करण्यात आलेली कार्यक्रम बाब अनुसमर्थनाबाबत.

प्राधिकरणाचे १९९७-९८ चे वार्षिक लेखे पूर्ण होवून या लेख्यांचे महालेखापालांनी लेखापरिक्षण पूर्ण केले असून हे परिक्षण पूर्ण होण्यापूर्वी प्राधिकरणाने स्वीकृत केलेल्या लेख्याची प्रत महालेखापालांना सादर करणे आवश्यक होते व १९९७-९८ च्या वार्षिक लेख्यांना प्राधिकरणाची स्वीकृती घेण्यासाठी प्राधिकरणाची बैठक नजीकच्या काळात केव्हा होईल हे अनिश्चित असल्याने १९९७-९८ चे वार्षिक लेखे स्वीकृतीबाबत सर्व सदस्यांकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांना मा.अध्यक्षांसह १५ सदस्यांची मान्यता दिल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट करुन हे लेखे अनुसमर्थनासाठी या कार्यक्रम बाबीव्दारे सादर केल्याचे सांगितले.

या कार्यक्रम बाबीस सर्व सदस्यांनी मान्यता दिली.

## कार्यक्रम बाब क्र.४:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या व इतर निर्णयावर शिक्कामोर्तब.

प्राधिकरणाच्या ८२ व्या बैठकीनंतर दि.१६/३/९९ पर्यंत निविदा समितीच्या ७ बैठका झाल्या असून, त्यामध्ये ९७ निविदांच्या स्वीकृतीबाबत चर्चा करण्यात आली व त्यापैकी ८८ निविदा स्वीकृत तर उर्वरित ९ निविदा अस्वीकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला. याची माहिती देणारे तक्ता अ व ब सोबत जोडण्यात आल्याचे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी स्पष्ट करुन निविदा समितीने घेतलेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यासाठी ही बाब सादर केल्याचे सांगितले.

ज्या निविदा निविदा समितीने स्वीकृत केल्या त्यांना सदस्यांनी त्वरित मान्यता दिली. अस्वीकृत निविदांबाबत चर्चा करताना त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत याची विचारणा सदस्य श्री.माधव कुलकणी यांनी केली. त्यावर मा.अध्यक्ष महोदयांनी हे स्पष्ट केले की, प्रामुख्याने या निविदांचे देकार अवाजवी असल्याचे निविदा समितीस वाटल्याने या निविदा अस्वीकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला. या अनुषंगाने कामेरी व १४ गावांची प्रा.पा.पु.योजना,ता-वाळवा,जि-सांगली या कामाची निविदा मात्र थोड्या वेगळ्या कारणामुळे अस्वीकृत केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या योजनेमधील काही गावांचा समावेश दुसऱ्या योजनेमध्येही आहे त्यामुळे या योजनेतील गावांचा सर्वकष आढावा घेवून कोणत्या योजनेव्दारे या गावांना पाणी पुरवठा करणे सोयीस्कर होईल याची पाहणी करुनच निर्णय घ्यावा व त्याप्रमाणे गावांची सुयोग्य विभागणी करुन पुन्हा निविदा मागविण्यात येतील ही बाब अध्यक्षांनी स्पष्ट केल्यानंतर अस्वीकृत निविदांबाबतच्या निविदा समितीच्या निर्णयास सदस्यांनी मान्यता दिली.

निविदांसाठी पूर्वअर्हता ठरविताना ठेकेदाराच्या कंपनीचे निव्वळ आर्थिक मुल्य (NET WORTH) विचारात घेणे प्राधिकरणाच्या विचाराधीन होते. त्याबाबत निर्णय घेण्यात आला असून दि.४/३/९९ च्या परिपत्रकाव्दारे अशा सूचना निर्गमित केल्या आहेत की, ज्या निविदांची किंमत (Cost put to the Tender ) रु.२५ कोटी अथवा त्यापेक्षा जास्त असेल अशा सर्व ग्रामीण/नागरी पाणी पुरवठा/मलनि:सारण योजनांच्या कामांच्या निविदांसाठी ठेकेदाराचे निव्वळ आर्थिक मूल्य (NET WORTH ) तपासण्यात येवून ठेकेदाराची पूर्वअर्हता ठरविण्यात यावी. याबाबत असेही निर्देशित करण्यात आले आहे की,चार्टर्ड अकांउंटटकडून प्रमाणित करण्यात आलेल्या आर्थिक ताळेबंदानुसार सदर ठेकेदार घेवू इच्छित असलेले काम ज्या आर्थिक वर्षात येते त्या वर्षाच्या आधिच्या सलग ३ वर्षांचे सरासरी आर्थिक मूल्य निविदेतील कामाच्या किंमतीच्या किमान २५% असणे आवश्यक आहे ही बाब सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी निदर्शनास आणून दिली त्यास सदस्यांनी मान्यता दिली.

## कार्यक्रम बाब क्र.५:-प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या सेवा निवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६० वर्षापर्यंत वाढविणेबाबत.

राज्य शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीचे वय दि.२९/५/९८ च्या शासन निर्णयानुसार ५८ वर्षावरुन ६० वर्षापर्यंत वाढविले होते. त्याप्रमाणे प्राधिकरणाने आपल्या कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६० वर्षापर्यंत वाढविले होते. आता दि.२/२/९९ च्या शासन निर्णयाव्दारे राज्य शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षावरुन ५८ वर्षे विहित केले आहे. या शासन निर्णयानुसार प्राधिकरणाने आपल्या कर्मचाऱ्यांचे वया ६० वर्षावरुन ५८ वर्षे विहित करुन, मा.अध्यक्षांच्या परवानगीनंतर प्राधिकरणातील ज्या कर्मचाऱ्यांना दि.२८/२/९९ रोजी वा तत्पूर्वी वयाची ५८ वर्षे पूर्ण झाली होती त्यांना प्राधिकरणाच्या सेवेमधून दि.२८/२/९९ रोजी सेवानिवृत्त केलें आहे. याप्रमाणेच यापुढेही कार्यवाही करण्यात येणार आहे. या कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी मिळावी यासाठी ही कार्यक्रम बाब प्रस्तावित करण्यात आली आहे असे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रम बाबीस सर्व सदस्यांनी मान्यता दिली.

## कार्यक्रम बाब क्र.६:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन १९९८-९९ चे सुधारित अंदाजपत्रक व सन १९९९-२००० चे अंदाजपत्रक

प्राधिकरणाचे अंदाजपत्रक महसूली व भांडवली या दोन भागात विभागलेले आहे. सन १९९८-९९ चे मूळ तसेच सुधारित अंदाजपत्रक व सन १९९९-२००० चे अंदाजपत्रक याचा गोषवारा खालीलप्रमाणे असल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले.

| १) महसुली मिळकत (रु.लाखात) | | | महसुली खर्च (रु लाखात) | | |
|---|---|---|---|---|---|
| मुळ (९८-९९) | सुधारित (९८-९९) | अंदाज (९९-२०००) | मुळ (९८-९९) | सुधारित (९८-९९) | अंदाज (९९-२०००) |
| ३४८०६.४५ | २९८१२.३३ | ३९८५६.१४ | ३२२९३.८३ | २६५२७.०१ | ३७६५७.७१ |

| २) भांडवली मिळकत (रु.लाखात) | | | भांडवली खर्च (रु लाखात) | | |
|---|---|---|---|---|---|
| मुळ (९८-९९) | सुधारित (९८-९९) | अंदाज (९९-२०००) | मुळ (९८-९९) | सुधारित (९८-९९) | अंदाज (९९-२०००) |
| १६०५७२.०७ | १६४७७२.३६ | १७०५४२.०९ | १६०५७१.५७ | १६४७७२.३६ | १७०५४२.०९ |

वरील बाबी निदर्शनास आणून देवून सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सन १९९८-९९ च्या सुधारित अंदाजपत्रकास व सन १९९९-२००० च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यासाठी ही कार्यक्रम बाब सादर केल्याचे स्पष्ट केले.

या अनुषंगाने चर्चा करताना प्रधान सचिव,वित्त विभाग,यांनी काही मुद्यांच्या अनुषंगाने विचारणा केली; अंदाजपत्रकामधील काही बाबींमध्ये झालेल्या वाढीची कारणे जाणून घेतली. त्यांच्या मुद्यांबाबत सदस्य सचिव(प्रशासन) यांनी समर्पक उत्तरे दिल्यानंतर त्यांचे समाधान झाल्याचे निदर्शनास आले. तसेच काही ठिकाणच्या खर्चामध्ये काटकसर करणे शक्य आहे काय याबाबतही आढावा घेण्यात आला. याबाबत मा.अध्यक्ष महोदयांनी स्पष्ट केले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा वाढलेला कार्यभार,नवीन कार्यालयांची निर्मिती इत्यादी कारणांमुळे गतवर्षीपेक्षा खर्च जास्त होणार असल्याने व खर्चात काटकसर या बाबीचा पूर्णपणे विचार करुनच हे अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे. त्यानंतर सर्व सदस्यांनी सन १९९८-९९ च्या सुधारित अंदाजपत्रकास व १९९९-२००० सालच्या अंदाजपत्रकास प्रस्तावित केल्याप्रमाणे मान्यता दिली.

कार्यवाही

वि.स.व मुख्य लेखा अधिकारी

## कार्यक्रम बाब क्र.७:-सन १९९८-९९ मध्ये आयुर्विमा महामंडळाकडून प्रकल्प योजनांसाठी करावयाची कर्ज उभारणी.

महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून व केंद्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या सी.पी.एच.इ.इ.ओ. विभागाकडून अनुक्रमे प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता मिळालेल्या १० प्रकल्प योजनांसाठी आयुर्विमा महामंडळाने एकूण रु.६८.६० कोटी कर्ज मंजूर केले असून त्यापैकी ९८-९९ मध्ये रु.२२.१० कोटी कर्जाचा पहिला हप्ता मिळावयाचा आहे. एकंदरित १० प्रकल्प योजनांसाठी आयुर्विमा महामंडळाकडून ६८.६० कोटी कर्ज टप्प्या-टप्प्याने घेण्यासाठी व त्यांच्या अटी व शर्ती मान्य करण्यासाठी ही कार्यक्रम बाब मंजुरीसाठी सादर करण्यात आल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले.

हे कर्ज ९८-९९ या वर्षामध्ये घ्यावयाचे असून त्यासाठी फारच कमी कालावधी शिल्लक आहे ही बाब अपर मुख्य सचिव,यांनी स्पष्ट करुन खरेतर याबाबत यापूर्वीच कार्यवाही करणे आवश्यक होते असे अभिप्राय व्यक्त केले. यावर वित्तीस सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, यांनी स्पष्ट केले की, कर्जाचा प्रस्ताव खूप पूर्वी आयुर्विमा महामंडळास सादर करण्यात आला होता त्यावर दि.१६/२/९९ रोजी आयुर्विमा महामंडळाने अंतिम निर्णय कळविल्यामुळे या प्रकरणी प्राधिकरणाकडून दिरंगाई झाली नसल्याचे स्पष्ट केले. यावर उर्वरित कालावधीमध्ये या कार्यक्रम बाबीमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे कर्जाचा हप्ता प्राप्त होईल अशा पध्दतीने वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी प्रयत्न करावेत अशा सूचना अपर मुख्य सचिव यांनी दिल्या व या कार्यक्रम बाबीस सदस्यांनी मान्यता दिली.

कार्यवाही

वि.स.व मुख्य लेखा अधिकारी

## कार्यक्रम बाब क्र.८:-सन १९९८-९९ मध्ये नागरी पाणी पुरवठा व जलनि:सारण योजनांसाठी चालू व नवीन योजनांकरिता आयुर्विमा महामंडळाकडून योजनांतर्गत कर्ज उभारणी

सन १९९८-९९ मध्ये नागरी पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांकरिता आयुर्विमा महामंडळाकडून कर्ज उभारण्यासाठी शासनाच्या नियोजन विभागाने रु.५५ कोटीची तरतूद केली आहे. त्यानुसार प्राधिकरणाने २५ चालू व १६ नवीन योजनांकरिता एकूण रु.६५.४३२२ कोटीचे प्रस्ताव आयुर्विमा महामंडळास कर्ज मंजुरीसाठी पाठविले होते. त्यापैकी २४ चालू व ५ नवीन योजनांसाठी सन १९९८-९९ या वर्षाकरिता आयुर्विमा महामंडळाने रु.२२.१७ कोटींचे कर्ज प्रस्ताव मंजूर केले आहेत. सदर कर्ज आयुर्विमा महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार मिळणार आहे. आयुर्विमा महामंडळाच्या शर्ती व अटींच्या अधिन राहून सदर कर्ज घेण्यास मान्यता मिळण्यासाठी ही कार्यक्रम बाब प्रस्तावित करण्यात आल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रम बाबीस सर्व सदस्यांनी मान्यता दिली. तथापि,अशी प्रकरणे ऐन वेळेवर सादर न होता ती नोव्हेंबर/डिसेंबरपर्यंत सादर व्हावीत, जेणेकरुन कर्ज प्राप्ती व त्याचा विनियोग यासाठी पुरेसा वेळ मिळू शकेल त्यामुळे अशा प्रस्तावांना प्राधान्याने मंजुरी मिळण्यासाठी आयुर्विमा महामंडळाकडे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,यांनी १९९९-२००० या साली प्रयत्न करावेत व नोव्हेंबर/डिसेंबर पर्यंत कर्ज मिळेल असे पहावे अशी सूचना अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांनी केली.

....८....

## कार्यक्रम बाब क्र.९:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रकल्प क्षेत्राबाहेरच्या पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाणी पुरवठयाचे सन १९९९-२००० साठी दर सुधारित करण्याबाबत.

प्राधिकरणास आपला कारभार शक्यतो विना तोटा चालवावयाचा आहे. प्राधिकरणाने सध्याचे पाणी पुरवठा दर हे दि.१/५/९७ पासून अंमलात आणण्यात आले आहेत. गेल्या वर्षी पाणी पुरवठा दर वाढविण्यात आले नव्हते. सन १९९८-९९ मध्ये पाणी पुरवठ्यापासून मिळणारे अपेक्षित उत्पन्न रु.४९६९.८८ लक्ष असून अपेक्षित खर्च रु.५७३४.५६ लक्ष आहे म्हणजेच ९८-९९ या वर्षांत रु.७६४.६८ लक्ष इतकी तूट अपेक्षित आहे. तसेच १९९९-२००० मध्ये विद्यमान दराने अपेक्षित महसूल रु.४९९०.९५ लक्ष तर अपेक्षित खर्च रु.६८६६.७८ लक्ष होणार आहे म्हणजेच रु.१८७५.८३ लक्ष इतकी तूट अपेक्षित आहे. त्यामुळे साधारणत: विद्यमान दरामध्ये २०% वाढ करावी लागेल. ही वाढ करुन सुध्दा सन १९९९-२००० मध्ये अपेक्षित तुट रु.७९३.५३ लक्ष राहणार आहे. त्यामुळे दि.१/५/९९ पासून पाणी पुरवठ्याच्या विद्यमान दरामध्ये २०% वाढ करुन ते दर अमंलात आणावेत यासाठी मंजुरी मिळण्यासाठी ही कार्यक्रम बाब प्रस्तावित करण्यात आली आहे.

यावर अशी दरवाढ करणे खरोखरच गरजेचे आहे काय अशी विचारणा मा.अध्यक्ष महोदयांनी केली. त्यावर सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले की, सामान्यत: महागाईमध्ये दरवर्षी १५% वाढ होत असते तसेच वीज दरवाढ देखील साधारण २०% होते तसेच कर्जांची परतफेड, वेतनामध्ये होणारी वाढ इत्यादी बाबी लक्षात घेतल्यास ही दरवाढ करणे गरजेचे आहे. तसेच ही दरवाढ दोन वर्षानंतर होणार आहे त्यामुळे प्रत्येक वर्षात ही दरवाढ १०% याच प्रमाणात असल्याने ती रास्त आहे.

कार्यवाही

वि.स.व मुख्य लेखा अधिकारी

यावर अपर मुख्य सचिव यांनी सूचना दिल्या की, अंबाझरी,ओझर इत्यादी लष्करी साहित्य निर्माण कारखाने, तारापूर अणूशक्ती केंद्र यांना होणाऱ्या पाणी पुरवठयामध्ये जास्तीची दरवाढ करुन अपेक्षित तुटीचे प्रमाण काही प्रमाणात कमी करता येईल काय याचा आढावा घ्यावा. यावर सदस्य सचिव(प्रशासन) यांनी याप्रमाणे आढावा घेवून त्यांना प्रस्ताव सादर करण्यात येईल असे सांगितले. यानंतर सर्व सदस्यांनी दरवाढीच्या प्रस्तावास मान्यता दिली. तथापि, नागरिकांचा विरोध झाल्यास काही प्रमाणात दरवाढ कमी करण्याबाबतही विचार करावा अशा सूचना अध्यक्ष महोदयांनी केल्या. तसेच विलंब आकारामध्ये काही वाढ करता येईल काय ज्यामुळे थकबाकीचे प्रमाण कमी होईल हा मुद्या प्रधान सचिव,वित्त विभाग,यांनी मांडला. यावर कार्यक्रम बाब क्रमांक १० च्या अंतर्गत चर्चा करण्यात आली.

## कार्यक्रम बाब क्र.१०:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रकल्प क्षेत्रातील पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाणी पुरवठयाचे सन १९९९-२००० करिता सुधारित दर आकारण्याबाबत.

प्रकल्प क्षेत्रातील पाणी पुरवठ्याचे विद्यमान दर १/७/९७ पासून अमंलात असून गतवर्षी यामध्ये वाढ करण्यात आलेली नव्हती. सद्यस्थितीत प्रकल्प क्षेत्रात टेमघर व बदलापूर पाणी पुरवठा केंद्रामधून होणाऱ्या पाणी पुरवठ्याचा समावेश आहे. सन ९८-९९ मधील या पाणी पुरवठ्यावर होणारा अपेक्षित खर्च रु.३०९६.०२ लक्ष असून अपेक्षित महसूल रु.३९४३.९५ आहे म्हणजेच रु.८४७.९३ लक्षाचे अधिक्य आहे. हे अधिक्य प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठ्यामुळे येणारी तूट भरुन काढण्यासाठी वापरावे लागते. जेणेकरुन प्राधिकरणाकडून होणारा एकूण पाणी पुरवठा विना तोटा चालविण्यास मदत होते. सन १९९९-२००० या वर्षामध्ये या पाणी पुरवठ्यावर होणारा अपेक्षित खर्च रु.३६७२.९९ लक्ष असून विद्यमान दराने मिळणारा अपेक्षित महसूल रु.४००५.०४ लक्ष राहणार आहे. म्हणजेच रु.३३२.०५ लक्षाचे अधिक्य मिळणार आहे जे की, प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठ्यामध्ये येणारी तूट भरुन काढण्यात अपुरे आहे. तसचे जागतिक बँकेबरोबर झालेल्या करारानुसार प्रकल्प क्षेत्रातील पाणी पुरवठा केंद्रावर होणाऱ्या खर्चाचा आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस आढावा घेवून प्रकल्प क्षेत्रातील पाणी पुरवठा दर सुधारित करुन सरासरी मालमत्तेच्या किंमतीच्या ६% प्रतिलाभ मिळविणे आवश्यक आहे. तसेच वीज दरवाढ, वेतनातील वाढ व वाढती महागाई

याचा विचार केल्यास पाणी पुरवठ्याच्या विद्यमान दरामध्ये २०% वाढ करणे आवश्यक असल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले व यामुळे रु.१२००.८९ लक्ष अधिक्य मिळू शकेल. विद्यमान दरामध्ये २०% वाढ करण्यात येवून हे पाणी पुरवठ्याचे दर दि.१/५/९९ पासून अमंलात आणण्यास मान्यता मिळावी म्हणून ही कार्यक्रम बाब प्रस्तावित केल्याचे सांगितले.

या अनुषंगाने चर्चा करतांना सदस्य सचिव(प्रशासन) यांनी निदर्शनास आणून दिले की, प्रकल्प क्षेत्रातील टेमघर पाणी पुरवठा केंद्र ठाणे महानगरपालिकेस हस्तांतरित करावयाचे आहे. त्यामुळे या हस्तांतरणानंतर मिळणारा महसूल बंद होणार असल्याने रु.१२००.८९ लक्ष अधिक्य महसूल मिळेल असे जरी गृहित धरले असले तरी तितका महसूल प्रत्यक्षात प्राप्त होणार नाही ही बाबही विचारात घ्यावी. या सर्व चर्चेनंतर विद्यमान दरामध्ये २०% वाढ करुन हे दर दि.१/५/९९ पासून अमंलात आणण्याच्या प्रस्तावास सदस्यांनी मान्यता दिली.

कार्यवाही

मि.स.व मुख्य
लेखा अधिकारी

पाण्याच्या विद्यमान दरातील वाढ या अनुषंगाने चर्चा करताना प्रधान सचिव,वित्त विभाग, यांनी सूचना केली की, जे ग्राहक देयके निर्गमित केलेल्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत देयके भरणार नाहीत अशा ग्राहकांना थकीत रक्कमेवर १.५०% दरमहा दराने विलंब आकार लावण्यात येतो तो २.०% दरमहा या दराने आकारावा. यावर सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले की, ही विलंब आकारणी बायलॉजनुसार करण्यात येते. यावर प्रधान सचिव,वित्त विभाग, यांनी बायलॉजमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव सादर करावा अशा सूचना केल्या. विलंब आकारामध्ये वाढ केल्यामुळे विलंब आकार लागू नये म्हणून ग्राहकांकडून देयके सत्वर अदा करण्याची कार्यवाही होईल. जेणेकरुन महसुलामध्ये वाढ होईल. या अनुषंगाने चर्चा करतांना सदस्यांकडून अशीही विचारणा करण्यात आली की, ग्राहकांना देण्यात येणारी देयके व होणारी वसुली याची स्थिती काय आहे. यावर सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले की, थेट ग्राहकांपर्यंत पाणी पुरवठा होतो अशा ठिकाणी ही वसुली साधारणत:८७% तर जेथे ठोक पाणी पुरवठा करण्यात येतो अशा ठिकाणी साधारणत: ६७% आहे. वसुली वाढविण्याबाबतही प्राधिकरणाकडून प्रयत्न व्हावेत अशाही सूचना सदस्यांनी केल्या.

कार्यवाही

स.स.(प्रशासन)
व मुख्य प्रशासकीय
अधिकारी

<u>हस्तांतर</u>

हस्तांरणाच्या अनुषंगाने चर्चा करताना अपर मुख्य सचिव,यांनी निदर्शनास आणून दिले की, ज्या पाणी पुरवठा योजना चालविण्यासाठी तुट येत नाही त्याच पाणी पुरवठा योजना नगरपरिषद/महानगरपालिका हस्तांतरित करुन घेतात व जेथे तुट आहे अशा पाणी पुरवठा योजना हस्तांरित करुन घेण्याबाबत टाळाटाळ करण्यात येते. तसेच हस्तांतरणामुळे कर्मचाऱ्यांचाही प्रश्न निर्माण झाला आहे. योजना जरी हस्तांतरित झाली तरी या योजनेवरील सर्वच कर्मचारी नगरपरिषदांनी हस्तांतरित करुन घेतलेले नाहीत. त्यामुळे या कर्मचाऱ्यांबाबत काय निर्णय घ्यावयाचा हा प्रश्न प्राधिकरणाच्या विचाराधिन आहे. सध्या प्राधिकरणामध्ये बऱ्याचशा संवर्गातील पदे रिकामी असून त्या ठिकाणी कोणता मार्ग किंवा काय उपाय योजना करावी लागेल याचा आढावा घेवून सदस्य सचिव(प्रशासन) यांनी तसा प्रस्ताव शासनास सादर करावा अशा सूचना अपर मुख्य सचिव यांनी केल्या.

## कार्यक्रम बाब क्र.११:-राज्यातील महानगरपालिका क्षेत्रामध्ये(बृहन्मुंबई वगळून) पाणी पुरवठयाकरिता किमान दर लावण्याबाबत.

बृहन्मुंबई महानगरपलिका वगळता राज्यातील इतर महानगरपालिकांसाठी पाणी पुरवठ्याचे किमान दर काय असावेत याची विचारणा शासनाकडून करण्यात आली होती. या अनुषंगाने आढावा घेताना ही पाणी पुरवठा केंद्रे ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्यासाठी योजनांच्या दैनंदिन देखभाल व दुरुस्तीवर होणारा खर्च, पाणी पुरवठा योजनांसाठी घेतलेल्या कर्जांची परतफेड इत्यादी बाबी विचारात घेवून पाण्याचा उत्पादन खर्च लक्षात घेता महानगरपालिकांकडून पाणी पुरवठयाकरिता किमान दर काय असावेत याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. यावर शासनाने या प्रस्तावानुषंगाने प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये चर्चा करुन त्यास मान्यता घेवून प्रस्ताव सादर करावा अशा सूचना दिल्याने ही कार्यक्रम बाब मान्यतेसाठी सादर केल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये पाणी पुरवठ्याचे किमान दर काय असावेत याबाबत शासनाकडून कार्यवाही होणार असल्याने व प्राधिकरणास हा प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी मान्यता हवी आहे ही बाब सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केल्यानंतर या कार्यक्रम बाबीस सदस्यांनी मान्यता दिली व प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना दिल्या.

## कार्यक्रम बाब क्र.१२:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची सध्याची आर्थिक परिस्थिती

प्राधिकरणाची आर्थिक स्थिती प्राधिकरणाच्या प्रत्येक बैठकीमध्ये सादर करण्याच्या सूचनेनुसार ही कार्यक्रम बाब प्रस्तावित करण्यात आली असल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले.

या अनुषंगाने चर्चा करताना सदस्य सचिव(प्रशासन) यांनी निदर्शनास आणून दिले की, पाणी पुरवठ्याची देयके, कर्ज परतफेडी, देखभाल दुरुस्ती, पूर्ण ठेव कामे,लोकवर्गणी व इतर इत्यादी अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांकडे रु.५०३.६६ कोटी थकबाकी प्रलंबित आहे. थकबाकी व वसुली संदर्भात प्राधिकरणाकडून खूप प्रयत्न करण्यात येतात पण त्याला योग्य प्रतिसादर मिळत नाही. तसेच जरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देय असणाऱ्या असंविधानिक अनुदानाच्या ५०% रक्कम शासन स्तरावरुन कपात करुन प्राधिकरणास उपलब्ध करुन दिली जाते. तरीसुध्दा थकबाकीची रक्कम कमी न होता दिवसेंदिवस वाढतच आहे त्यामुळे थकबाकी वसुली संबंधी काही ठोस उपाय योजना करण्याची नितांत गरज असल्याची बाब सदस्य सचिव(प्रशासन) यांनी सदस्यांसमोर मांडली.

या अनुषंगाने उदाहरण देताना त्यांनी सदस्यांच्या निदर्शनास आणून दिले की, १९९८-९९ या वर्षात नगरपालिका/महानगरपालिका यांच्या वतीने प्राधिकरणाला रु.१३४.५४ कोटी कर्ज परतफेडीचे दायीत्व आहे. यापैकी दि.१५/३/९९ पर्यंत प्राधिकरणाने रु.७२.७६ कोटी कर्जाची परतफेड केली. मात्र संबंधित नगरपालिका/महानगरपालिकांकडून फक्त रु.२२.२३ कोटी प्राप्त झाले आहेत. तसेच दि.३१/३/९९ पर्यंत प्राधिकरणास आणखीन रु.६१.७८ कोटी इतक्या कर्ज परतफेडीचे दायीत्व आहे. यासाठी प्राधिकरणास भांडवली खर्चासाठी उपलब्ध असणारा निधी कर्जफेडीसाठी वळवावा लागतो. यास लेखा परिक्षणामध्ये आक्षेप घेण्यात आले आहेत.

कार्यवाही

स.स. (प्रशासन व अर्थ)/वि.स.

मुख्य लेखा अधिकारी

उपरोक्त सर्व परिस्थिती पाहता वसुलीबाबत करावयाची उपाय योजना सुचविताना सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले की, आता नगरपालिकांकडून आकारण्यात येणारा जकात कर अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार शासनाने रद्द केला आहे व त्याऐवजी शासनाकडून नगरपरिषदांना अनुदान देण्यात येणार आहे. या अनुदानातून काही ठोस रक्कम शासनस्तरावरच कपात करुन पाणी पुरवठा योजनांच्या थकबाकीपोटी प्राधिकरणास (असंविधानिक अनुदानाप्रमाणे) वर्ग केल्यास थकबाकीची रक्कम कमी होण्यास मदत होवू शकेल. याबाबत सदस्य सचिव(प्रशासन) यांनी शासनास प्रस्ताव सादर करावा अशा सूचना मा.अध्यक्ष महोदयांनी दिल्या व या कार्यक्रम बाबीवरील चर्चा पूर्ण झाली.

प्राधिकरणाच्या आर्थिक स्थितीबाबत सर्वसाधारण चर्चा करताना अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांनी सूचना केल्या की, न्हावा-शेवा योजनेतंर्गत चालू असणाऱ्या मोर्बे धरणाच्या कामासाठी जर सिडकोकडून वेळेवर निधी प्राप्त होत नसेल तर हे काम बंद करण्याबाबत निर्णय घ्यावा लागेल. या वर विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता,यांनी सांगितले की, या प्रकरणी एका बैठकीचे आयोजन करण्यात आले असून सत्वर निधी बाबत निर्णय घेण्यात येईल. यावर अपर मुख्य सचिव,यांनी पुन्हा स्पष्ट केले की, सिडकोकडून निधी न मिळाल्यास कामावर काय परिणाम होईल याची सिडको प्रशासनास स्पष्ट कल्पना देण्यात यावी व निधी देण्याबाबत त्यांना विनंती करावी व निधीअभावी काम बंद करण्यासारखी कार्यवाही करण्यात येईल असेही स्पष्ट करावे.

## कार्यक्रम बाब क्र.१३:-रेखाचित्र शाखा संवर्गातील विविध पदांना पुन: सुधारित वेतनश्रेणी मंजुर करण्याबाबत.

दि.३१/१०/९८ च्या शासन निर्णयाव्दारे रेखाचित्र शाखेतील अनुरेखक, सहा.आरेखक व आरेखक यांना पुन: सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली असून ती प्राधिकरणातील रेखाचित्र शाखा संवर्गातील पदांना प्रथम

प्राधिकरणाची व नंतर शासनाची मान्यता घेवून लागू करावी यासाठी मान्यता देण्यात यावी म्हणून ही कार्यक्रम बाब प्रस्तावित करण्यात आल्याचे सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रम बाबीस प्राधिकरणाच्या सदस्यांनी मान्यता दिली. तसेच हा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा अशा सूचना दिल्या व शासनाच्या मान्यतेनंतर सुधारित वेतनश्रेणी प्राधिकरणातील रेखाचित्र शाखेतील कर्मचाऱ्यांना देण्याबाबतही मान्यता दिली.

## आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र.१:-अमरावती पाणी पुरवठा योजनेतंर्गत विद्युत शक्तीमध्ये बचत करणेबाबत.

मोर्शी(सिंगोरा) येथील पंपहाऊसमधून दररोज ९५ द.ल.लि. पाणी पंप करुन अमरावती शहराच्या पाणी पुरवठयासाठी उपलब्ध करुन दिले जाते. हे पंपहाऊस अपर वर्धा धरणाजवळ असून धरणातील पाणी गुरुत्व पध्दतीने संपमध्ये घेण्यात येते. हे पाणी पुढे पंप करण्यासाठी प्रतिवर्षी सुमारे ४ ते ४.२५ कोटीची विद्युत देयके अदा करावी लागतात. धरणातील पाण्याच्या पातळीचा विचार करता आपोआप मिळणारे पॉझिटीव्ह हेड याचा वापर केल्यास १०/१५ मीटरचा फायदा घेता येईल असे निदर्शनास आले. मात्र यासाठी धरणातील पाणी बंद पाईपलाईनव्दारे पंपापर्यंत नेणे आवश्यक आहे. तसचे सध्या अस्तित्वात असणाऱ्या नेरपिंगळाई येथील दाबमोचक टाकी मधील पाण्याची पातळी खाली केल्यास व जोड पध्दतीचा बीपीटी बांधल्यास किमान ५ मीटर हेड कमी करता येईल ही बाब निदर्शनास आली. त्यामुळे धरणातील पाणी बंद पाईप लाईनव्दारे पंपापर्यंत आणणे,नेरपिंगळाई येथे जोड बीपीटी बांधणे व अनुषंगीक कामे यासाठी रु.५५ लक्ष खर्च होणार आहे. या बदलामुळे पंपींग हेड कमी झाल्यामुळे पंपाची पाणी उपासण्याची क्षमता वाढून ९५ द.ल.ली.पाणी उचलण्याचा पंपींग कालावधी कमी होईल व त्यामुळे बरीचशी विद्युत बचत होईल . ही बचत साधारणपणे ४ ते ४.२५ कोटीच्या किमान ११% असून त्यामुळे वर्षाकाठी सुमारे ३९ लक्ष रुपयांची बचत होऊ शकते ही बाब अधीक्षक अभियंता(यांत्रिकी) यांनी सर्व सदस्यांना समजावून दिली.

हा रु.५५ लाख खर्च अमरावती शहराच्या वितरण व्यवस्थेच्या मंजूर योजनेमधून अतिरिक्त खर्च म्हणून करण्यात येईल. या योजनेची किंमत रु.४३.६५ कोटी असून आतापर्यंत या योजनेवर रु.२४ कोटी खर्च झाल्याचे अधीक्षक अभियंता(यांत्रिकी) यांनी स्पष्ट करुन हा खर्च करण्यास मान्यता मिळावी म्हणून सदर कार्यक्रम बाब प्रस्तावित करण्यात आल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले.

कार्यवाही

...-,अमरावती
अ.अ. (यांत्रिकी)
ठाणे

या कार्यक्रम बाबीवर चर्चा करताना मा.अध्यक्ष महोदयांनी विचारणा केली की, प्रथम रु.५५ लक्ष खर्च केल्यास प्रत्येक वर्षात सुमारे रु.३९ लक्ष बचत विद्युत देयकांमध्ये होणार असेल तर हे काम अमरावती वितरण व्यवस्थेच्या योजनेतून घेण्यास हरकत नसावी यास सर्व सदस्यांनी मान्यता दिली.

## आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र.२:- अमरावती मंडळातील पाणी पुरवठा केंद्रावरील पाण्याची देयके सहाकारी बँकामार्फत स्वीकारण्याबाबत.

अमरावती शहरास प्राधिकरणाकडून थेट ग्राहकांपर्यंत पाणी पुरवठा करण्यात येतो व पाणी देयकांची वसुली अमरावती पाणी पुरवठा केंद्र येथे करण्यात येते. हे ठिकाण शहरापासून बरेच दूर असल्याने व अपुरा कर्मचारी वर्ग यामुळे पाणी पट्टी वसुलीवर परिणाम होत आहे. त्यामुळे पाणी पट्टी स्वीकारण्याचे काम राष्ट्रीयकृत बँकामार्फत करण्यात यावे या दृष्टीने आढावा घेतला होता पण प्रतिसाद न मिळाल्यामुळे हे काम सहकारी बँकामार्फत करण्याच्या दृष्टीने आढावा घेतला असता प्राप्त प्रस्तावांपैकी 'दि खामगाव अर्बन सहकारी बँक लिमिटेड,खामगाव ' यांचा सुधारित प्रस्ताव कमी खर्चाचा व योग्य असल्याचे आढळून आले. या बँकेस प्रति देयकापोटी रु.१/-प्रमाणे रक्कम दयावी लागेल तसेच या बँकेकडून महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाची देयके स्वीकारण्यात येत असल्याने त्यांना देयके स्वीकारण्याबाबत अनुभवही आहे ही बाब विचारात घेवून व या बँकेच्या अमरावती शहरामध्ये ५ शाखा असल्यामुळे या ५ ही ठिकाणी पाणी देयकांची

(९३)



व मुख्य
अधिकारी

वसुली होवू शकते ही बाब सदस्य सचिव(तांत्रिकी) यांनी सदस्यांच्या निदर्शनास आणून दिली. यापूर्वीही याबाबतची कार्यक्रम बाब प्राधिकरणाने मंजुरी दिल्यानंतर शासनाच्या मंजुरीसाठी सादर केली आहे परंतू त्यास अद्याप मंजुरी मिळालेली नाही. याबाबत शासनाकडून या बँकेच्या आर्थिक स्थितीची माहिती मागविण्यात आली होती ती दि.१७/३/९९ रोजी सादर करण्यात आली आहे. या प्रकरणी शासनाचा निर्णय अद्याप प्रलंबित आहे. हा निर्णय प्राप्त होईपर्यंत दि खामगाव अर्बन सहाकारी बँक लिमिटेड, खामगांव यांच्यामार्फत त्यांच्या शर्ती व अटींच्या अधीन राहून अमरावती शहराच्या पाणी पुरवठयाची देयके स्वीकारण्यास मान्यता मिळावी म्हणून ही कार्यक्रम बाब प्रस्तावित केल्याचे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणी शासनाच्या निर्णयाची अजून काही दिवस प्रतिक्षा करावी असे सदस्यांनी स्पष्ट केले व ही कार्यक्रम बाब स्थगित ठेवण्यात आली.

कार्यवाही

मुख्य प्रशासकीय अधिकारी

यानंतर सर्वसाधारण चर्चा करताना श्री.आशिष कुलकर्णी यांनी मुद्या मांडला की, यांत्रिकी शाखेची पुनर्रचना व विस्तार याबाबत कार्यवाही करणे जरुरीचे आहे. यावर सदस्य सचिव(प्रशासन) यांनी स्पष्ट केले की, या अनुषंगाने पूर्वी कार्यक्रम बाब प्रस्तावित करण्यात आली असता इतर राज्यामध्ये यांत्रिकी शाखेची रचना कशी आहे याचा आढावा घेवून माहिती सादर करावी असे ठरविण्यात आले होते. या बाबतची माहिती मिळविण्यात आली असून प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये कार्यक्रम बाब मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

या बैठकीमध्ये सर्वसाधारण चर्चा करताना मा.अध्यक्ष महोदयांनी खालील बाबी निदर्शनास आणून देवून कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

कार्यवाही

मुख्य अभियंता, पुणे

१) हातकणंगले व २ गावांच्या पाणी पुरवठा योजनेसंबंधी काय कार्यवाही करण्यात आली याची माहिती सादर करावी, त्यानुसार सदर माहिती सादर करण्यात येईल असे विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता,यांनी सांगितले.

२) सध्या उन्हाळ्यास सुरुवात झाली असून पाणी टंचाईच्या समस्यांना देखील सुरुवात झाली आहे. अशा परिस्थितीत प्रगतीपथावरील योजना प्राधान्याने पूर्ण करणे आवश्यक आहे, कही योजना पूर्णत्वाच्या मार्गावर असून फक्त विद्युत पुरवठयाअभावी कार्यान्वित होऊ शकलेल्या नाहीत. अशा योजनांबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाशी चर्चा करुन काही मार्ग निघू शकतो का याचा आढावा घ्यावा. ज्या ठिकाणी पूर्वीच्या थकबाकीमुळे विद्युत जोडणी मिळण्यास अडचणी येत आहेत त्याबाबत अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांनी शासन स्तरावर काही कार्यवाही करावी/काही निर्णय घेण्यात यावेत. जेणेकरुन विद्युत जोडणी मिळून पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करता येतील व पाणी टंचाईच्या प्रश्नावर काही अंशी मार्ग निघू शकेल.

कार्यवाही

अधीक्षक अभियंता (समन्वय)

३) काही पाणी पुरवठा योजनांच्या विद्युत जोडणीसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास नव्याने व्यवस्था करावी लागते. अशा ठिकाणी पाणी पुरवठा योजना पूर्ण होण्याच्या टप्प्यावर आल्यानंतर विद्युत जोडणीची मागणी करण्यात येते. त्यानंतर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून विद्युत जोडणी देण्याबाबत आवश्यक ती कामे हाती घेण्यात येतात यामध्ये बराचसा कालावधी जातो व पाणी पुरवठा योजना पूर्ण होवूनही कार्यान्वित न झाल्यामुळे नागरिकांना लाभ मिळू शकत नाही. त्यामुळे योजनेची कामे हाती घेताच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे विद्युत पुरवठयाची मागणी करावी व आवश्यक तो निधी वर्ग करावा व त्यानंतर विद्युत जोडणी अनुषंगीक कामे महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाकडून सत्वर हाती घ्यावीत अशी विनंती त्यांना करावी व पाणी पुरवठा योजना केव्हा पूर्ण/कार्यान्वित होईल याचा आढावा घेवून तारीख निश्चित करावी व त्या तारखेस योजना पूर्ण होवो अगर न होवो विद्युत जोडणी घेण्यात येईल अशी हमी महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळास देण्यात यावी. जेणेकरुन पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यासही चालना मिळेल व विलंबावर देखील बंधने येतील. तसेच विद्युत जोडणी अभावी पूर्ण झालेली पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करता न येणे असे प्रकार टाळता येतील. याबाबत आढावा घेवून प्राधिकरणाने कार्यप्रणाली निश्चित करावी.

४) मा.अध्यक्षांनी अशासकीय सदस्यांना सुविधा पुरविणे हयाबाबत म्हटले की, प्राधिकरणाच्या अशासकीय सदस्यांना सुविधा पुरविणे ही बाब बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित आहे. खरे तर याकडे ज्या गांभीर्याने पहावयास हवे त्या गांभीर्याने /जाणीवीने पाहिले जात नाही ही बाब उद्वेगजनक आहे. प्राधिकरणाच्या सदस्यांना दयावयाच्या सुविधा तरी कोणत्या ? प्राधिकरणाच्या मंडळ कार्यालयामध्ये बसण्याची स्वतंत्र व्यवस्था,एस.टी.डी. विरहित दूरध्वनी सेवा, पाणी पुरवठा योजनांच्या पाहणीसाठी ठराविक/मर्यादित अंतरापर्यंत वाहन व्यवस्था.( या सुविधांवर वर्षाकाठी होणारा खर्च किती, फारफार तर ४ ते ५ लक्ष रुपये.) सन २००० सालापर्यंत महाराष्ट्र टँकरमुक्त करणे या महत्वाकांक्षी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यामध्ये ज्या प्राधिकरणाचा महत्वाचा वाटा आहे त्या प्राधिकरणाच्या सदस्यांना खर्चात काटकसर या सबबी अंतर्गत उपरोक्त सुविधा नाकारणे ही बाब योग्य नाही. प्राधिकरणाच्या अर्थसंकल्पाचा विचार केल्यास प्राधिकरणाच्या सदस्यांना उपलब्ध करुन दयावयाच्या सुविधांवर होणारा खर्च हा फारच नगण्य आहे. या सुविधांचा प्रस्ताव शासनास सादर केल्यानंतर त्यास मान्यता मिळावी म्हणून प्रस्तावाचे प्रभावीपणे समर्थन करण्याबाबत प्राधिकरण प्रशासनाने ज्या प्रमाणात प्रयत्न करावयास हवे होते त्या प्रमाणात प्रयत्न न झाल्याने शासनाने हा प्रस्ताव नामंजूर केला असावा असे दिसते. किंबहुना प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना दयावयाची वेतनवाढ किंवा इतर सोयी याबाबत प्रशासनाकडून जितक्या हिरीरीने प्रयत्न करण्यात येतात इतका पाठपुरावा या प्रकरणी करण्यात येत नाही.

कार्यवाही

मुख्य प्रशासकीय अधिकारी

प्राधिकरणाच्या सदस्यांसाठी दयावयाच्या सुविधा व त्यावर होणारा खर्च हा प्राधिकरणाच्या एकूण खर्चाच्या प्रमाणात किती नगण्य आहे याचा विचार वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी करावा व खर्चात काटकसर या सबबीखाली हा प्रस्ताव नामंजूर करु नये. पाणी पुरवठा योजनांच्या कामांना सदस्यांकडून देण्यात येणाऱ्या भेटींमुळे कामांची गुणवत्ता निश्चितपणे सुधारेल/चांगली ठेवण्याचा प्रयत्न होईल या अप्रत्यक्ष फायदयाचा विचार केल्यास सुविधांवरचा खर्च वाया जाईल असे म्हणण्याचे धाडस कोणी करु नये. त्यामुळे प्राधिकरण सदस्यांना दयावयाच्या सुविधांबाबतच्या प्रस्तावास सदस्य सचिव(प्रशासन) यांनी वित्त विभागाच्या प्रधान सचिवांबरोबर चर्चा करुन मंजूरी घ्यावी.

उपरोक्त सूचनांनंतर या सभेचे कामकाज संपल्याचे मा.अध्यक्ष महोदयांनी जाहीर केले व सभा संपली.